# २. सिंह आणि कोल्हा

- चित्रे पाहा. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते सांगा.
- गोष्ट ऐका. गोष्ट सांगा.



एक होते जंगल. तिथे होता सिंह. तो पडला आजारी. कोल्हा आला त्याला भेटायला. सिंह म्हणाला, ''मला भूक लागली. मी आजारी आहे. तू इथे जवळच शिकार शोध.''

''हं, लगेच निघतो'' कोल्हा म्हणाला. कोल्ह्याला रानात मेंढ्या चरताना दिसल्या.



कोल्हा मनाशी म्हणाला, 'व्वा ! चांगली शिकार आहे. एक मेंढी पकडू. सिंहाकडे घेऊन जाऊ.' कोल्हा हळूहळू मेंढीजवळ जाऊ लागला. कुत्रा दुरून हे पाहत होता.



कुत्रा कोल्ह्याच्या मागे धावला. कोल्हा वेगाने पळून गेला.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना एकेक चित्र पाहायला सांगावे. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते विचारावे. चित्राशेजारचा मजकूर सलग वाचून दाखवावा. सर्व मजकूर वाचून झाल्यानंतर पुढे काय झाले असेल, त्याची कल्पना करायला सांगावे. गरजेनुसार विद्यार्थ्यांना मदत करावी. विद्यार्थ्यांच्या मदतीने गोष्ट पूर्ण करावी. शेवटी विद्यार्थ्यांना गोष्ट सलगपणे सांगायला लावावे. विद्यार्थ्यांच्या मदतीने वर्गात या गोष्टीचे सादरीकरण करून घ्यावे.



कोल्हा मनाशीच म्हणाला, ‘सुटलो बुवा एकदाचा. चला, आता सिंहाकडे जाऊ.’

सिंह म्हणाला, ‘‘काय रे, काय झालं ? कुठे आहे शिकार ?’’

कोल्हा म्हणाला, ‘‘शिकार दिसली, मी पकडायचा प्रयत्न केला. तेवढ्यात कुत्रा माझ्यावर धावून आला, म्हणून मी परत आलो. आता जातो. दुसरी शिकार शोधतो.’’

**पुढे काय झाले असेल, ते तुम्ही सांगा.**

- **चित्रे पाहा. प्रत्येक चित्रात काय कमी व काय जास्त ते ओळखा व सांगा.**

